# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

## अति.आयुक्त कार्यालय क्र.1


Mira Bhayandar @2047

जा.क्र.मनपा/अति.आ/ 79 /2024-25 दि.24/07/2024

**विषय :- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी BLO कर्मचारी यांनी कामाकाजात केलेल्या दिरगांई बाबत.**

**संदर्भ:- 1) शा. नि. क्र. मबादि-2024 / प्र.क्र.96/ कार्या-2 दि.28 जुन 2024.**
**2) महिला व बालकल्याण विभाग/ शा. नि. क्र.96/ कार्या-2 दि.3 जुलै 2024**
**3) जा.क्र.मनपा/आस्था/1093/2024-25 दि.12/07/2024 रोजीचे परिपत्रक**
**4) मा.अति.आयुक्त(1) यांच्या दालनात दि.22/07/2024 रोजी झालेल्या बैठकीतील निर्देश**

**<u>नोटीस</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 21 ते 65 या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुंटुंबातील केवळ एक अविवाहित महिला यांना मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणेकरीता प्रभाग क्षेत्रातील लाभार्थी महिलांकडून (Offline) पध्दतीने विहित केलेल्या अटीशर्तीसह आवश्यक असलेली कागदपत्रे जमा करुन सदरचे अर्ज Online द्वारे PLAY STORE वरुन Narishakti Doot App Download करुन नोंदणी करणे तसेच घरोघरी जाऊन ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज वितरण करणे व स्विकारणेकामी आपली संदर्भ क्र.3 अन्वये प्रभाग अधिकारी तथा नोडल अधिकारी यांच्या अधिपत्याखाली प्रभागनिहाय BLO कर्मचारी म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे.

त्याअनुषंगे निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये नियुक्त केलेल्या सर्व BLO कर्मचारी यांनी दि.14/07/2024 पासून घरोघरी जावून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज/फॉर्म जमा किंवा नोंदणी सर्वेक्षण करणे अभिप्रेत होते तथापि या संदर्भात दि.22/07/2024 रोजी सहा.आयुक्त तथा नोडल अधिकारी यांचे समवेत आढावा बैठक घेण्यात आली असता सदर बैठकीत संबंधित अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार BLO कर्मचाऱ्यांनी अदयापपर्यंत कामकाजास

सुरूवात केलेली नाही हि बाब अत्यंत गंभीर व बेजाबदारपणाची असून शासन योजनेची अंमलबजावणी बाबत आपले अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे.

सबब आपणास सूचित करण्यात येते की, आपण घरोघरी जाऊन ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज भरणेस व नारी शक्ती दुत ॲप वर अपलोड करणेची कार्यवाहीस तात्काळ सुरुवात करावी व त्याप्रमाणे दैनंदिन लेखी अहवाल संबंधित सहा.आयुक्त तथा नोडल अधिकारी यांना सादर करावा तसेच आपणास नेमून दिलेले काम मुदतीत पुर्ण करावे अन्यथा आपणाविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(अनिकेत मानोरकर)**
**अतिरिक्त आयुक्त(1)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,

1) सहा.आयुक्त तथा नोडल अधिकारी
2) संबंधित BLO कर्मचारी
(सोबत यादी जोडली आहे.)